824

महाराष्ट्र शासन
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र. पोमसं/३६/ र.व का.(८३००) शा.नि.-अधिसूचना/०७/२०२५, मुंबई, ई.स्वाक्षरीस सादर

**संदर्भ :-** महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग परिपत्रक क्रमांक- प्राविचौ-१४२५/ प्र. क्र. ४६ / विचौ - २ , दि.२६/०८/२०२५.

**विषय :-** प्रादेशिक विभागीय चौकशी अ धिकारी कार्यालयांकडील चौकशी प्रकरणात व्हिडीओ कॉन्फरसिंगद्वारे सुनावणी घेणे-ई-साक्ष नोंदविण्याबाबत.

*****

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्रमांक- प्राविचौ-१४२५/ प्र. क्र.४६ / विचौ २, दि.२६/०८/२०२५ ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२५०८२६११४९२८४९०७ असा आहे.

२. तरी, सदर शासन परिपत्रकानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

Digitally signed by
PRAVIN MADHUKAR SHIKHARE
Date: 29-08-2025 10:57:20

( प्रविण शिखरे )
पोलीस महासंचालक यांचे उपसहायक (र.व का.),
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,

महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य ,मुंबई. (सस्नेह)
पोलीस महासंचालक, लोहमार्ग, महाराष्ट्र राज्य, मुंबई(सस्नेह).
पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई.
अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे.
अपर पोलीस महासंचालक,(आस्थापना/कायदा व सुव्यवस्था/ नियोजन व समन्वय/आर्थिक गुन्हे/दहशतवाद विरोधी पथक/ विशेष कृती/ प्रशासन/ वाहतूक/ प्रशिक्षण व खास पथके / फोर्स वन नागरी हक्क संरक्षण/ सायबर सुरक्षा / रा.रा.पो.बल / महिला व बाल अत्याचार प्रतिबंधक विभाग महाराष्ट्र राज्य, मुंबई.
आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य,मुंबई.
सर्व पोलीस आयुक्त (लोहमार्गासह)
अपर पोलीस महासंचालक, व संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक.
अपर पोलीस महासंचालक व संचालक, दळणवळण, माहिती तंत्रज्ञान व परिवहन, महाराष्ट्र राज्य, पुणे.



Scanned with CamScanner

विशेष पोलीस महानिरीक्षक, व्हीआयपी सुरक्षा, महाराष्ट्र राज्य, मुंबई./ मोटर परिवहन विभाग, पुणे/ नक्षल विरोधी अभियान, नागपूर.

विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना/ कायदा व सुव्यवस्था/ प्रशासन/ प्रशिक्षण व खास पथके), महाराष्ट्र राज्य, मुंबई

सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक / पोलीस उप महानिरीक्षक.

विशेष पोलीस महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, पुणे व नागपूर.

संचालक व विशेष पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी,पुणे.

सर्व पोलीस अधीक्षक ( गुन्हे/ बिनतारी संदेश/लोहमार्ग).

पोलीस अधीक्षक, विशेष कृती दल, सुराबर्डी, अमरावती रोड, नागपूर.

प्राचार्य, गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण केंद्र, नाशिक.

सर्व प्राचार्य पोलीस प्रशिक्षण केंद्र.

सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र.१ ते १९.

सहायक पोलीस महानिरीक्षक (का.व सु. / दक्षता/ धोरण/ नि.व स.), महाराष्ट्र राज्य, मुंबई.

पोलीस महासंचालक यांचे सर्व वरिष्ठ उप सहायक / उपसहायक.

सर्व कार्यासन अधिकारी, का क्र.१ ते ४४.

प्रत :-

पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय/परिपत्रके "सर्वसाधारण" या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.



Scanned with CamScanner

**प्रादेशिक विभागीय चौकशी अधिकारी कार्यालयांकडील चौकशी प्रकरणांत व्हिडीओ कॉन्फरसिंगद्वारे सुनावणी घेणे - ई-साक्ष नोंदविण्याबाबत**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांक: प्राविचौ-१४२५/प्र.क्र.४६/विचौ-२**
**मंत्रालय, मुंबई -४०००३२**
**दिनांक — २६ ऑगस्ट, २०२५**

**पहा:-** १) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. एसपीओ-२८०७/प्र.क्र.२१/०७/११-अ,दि.२८.१०.२००९
२) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र. संकीर्ण २०२४/प्र.क्र.६२/१८ (र.व का.), दि.१३.१०.२०२०
३) मा. उच्च न्यायालय, मुंबई, अधिसूचना क्र. Rule/P.१६०३/२०२२, दि.१७.११.२०२२
४) मा. उच्च न्यायालय, मुंबई, अधिसूचना क्र. Rule/P.१६०३/Notn.No.७/२०२४, दि.१९.१२.२०२४
५) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र. संकीर्ण २०२४/प्र.क्र.५७/विचौ-२, दि.०६.११.२०२४
६) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र.विभाचौ २०२४/प्र.क्र.०७/साअ-२, दि.१४.०२.२०२५
७) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र.वशिअ २०२५/प्र.क्र.३५/विचौ-१, दि.१०.०६.२०२५

**शासन परिपत्रक:-**

महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ अंतर्गत राज्य शासकीय कार्यालयांतील गट-अ (रु.७६००/- पेक्षा कमी ग्रेड पे) व गट-ब मधील राजपत्रित अधिकाऱ्यांविरुध्द सुरु करण्यात आलेल्या शिस्तभंगविषयक कार्यवाहीतील विभागीय चौकशीची कार्यवाही पूर्ण करुन संबंधित शिस्तभंगविषयक प्राधिकाऱ्यांना अहवाल सादर करण्यासाठी, प्रत्येक महसूली विभागाच्या मुख्यालयात एक याप्रमाणे सहा प्रादेशिक विभागीय चौकशी अधिकाऱ्यांची कार्यालये, संदर्भ क्र. १ येथील शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, दि.२८.१०.२००९ अन्वये निर्माण करण्यात आली आहेत. या चौकशी अधिकाऱ्यांकडून उक्त नियमांच्या नियम ८ व नियम १२ (एकत्रित कार्यवाही) अन्वये दोषारोप बजावण्यात आलेली प्रकरणे हाताळण्यात येतात.

२. विभागीय चौकशी प्रकरणे दीर्घकाळ प्रलंबित राहू नयेत, तसेच विभागीय चौकशी विनाविलंब निकाली काढण्याच्या अनुषंगाने, शिस्तभंगविषयक प्राधिकाऱ्यांनी परिपूर्ण प्रस्ताव चौकशी अधिकाऱ्यांना पाठविण्याबाबतच्या सूचना संदर्भ क्र.५ येथील दि.०६.११.२०२४ येथील परिपत्रकान्वये देण्यात आल्या आहेत. त्यानुसार शिस्तभंगविषयक प्राधिकाऱ्यांकडून प्रकरणाशी संबंधित सर्व कागदपत्रांसह परिपूर्ण प्रस्ताव चौकशी प्राधिकरणास प्राप्त झाल्यानंतर चौकशी अधिकाऱ्यांकडे प्राथमिक तसेच नियमित सुनावणी आयोजित करण्यात येते. तथापि, संबंधित प्रकरणांतील अपचारी अधिकारी/कर्मचारी, सरकारी साक्षीदार तसेच सादरकर्ता अधिकारी आयोजित सुनावण्यांना आजारपण, विकलांगता, कार्यबाहुल्य इ. कारणांमुळे काही वेळेला हजर रहात नाहीत. काही प्रकरणी शासकीय अधिकारी/कर्मचारी यांची विभागीय चौकशी सेवानिवृत्तीनंतर सुरु होते किंवा चौकशी सुरु झाल्यानंतर ते सेवानिवृत्त होतात. बहुतांश प्रकरणांतील सरकारी साक्षीदारसुध्दा सेवानिवृत्त झालेले असतात. त्यामुळे हे अपचारी अधिकारी/कर्मचारी व सरकारी साक्षीदार वयपरत्वे किंवा वैद्यकीय बाबी उद्भवल्यामुळे विभागीय चौकशीस उपस्थित रहाणे शक्य होत नसल्याचे चौकशी प्राधिकरणास कळवितात. त्यांच्या अनुपस्थितीमुळे चौकशी अधिकारी यांच्या वेळेचा अपव्यय होऊन विभागीय चौकशीचे कामकाज अपूर्ण राहते. संदर्भ क्र. ७ येथील शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, दि.१०.०६.२०२५ अन्वये विभागीय चौकशी प्रकरणातील संपूर्ण कार्यवाही अठरा महिन्यांत पूर्ण करण्याचे, तसेच चौकशी अधिकाऱ्याकडील कार्यवाही नऊ महिन्यांत पूर्ण निर्देश देण्यात आले आहेत. त्यामुळे विहीत वेळेत चौकशी पूर्ण न झाल्यास, या निर्देशाचा आधार घेऊन अपचारी अधिकारी/कर्मचारी न्यायालयात जाण्याचे प्रसंग उद्भवू शकतात.

३. सद्य:स्थितीत, अर्धन्यायिक स्वरुपाच्या प्रकरणांमध्ये डिजीटल माध्यमांचा (virtual medium) वापर करणे ही काळाची गरज आहे. त्यानुसार, सामान्य प्रशासन विभागाच्या संदर्भ क्र.२ येथील दि.१३.१०.२०२० च्या परिपत्रकान्वये कोविड-१९ च्या प्रादुर्भावाच्या परिस्थितीमध्ये अर्धन्यायिक स्वरुपाच्या प्रशासकीय सुनावण्या व कामकाज व्हिडीओ कॉन्फरन्सिंगच्या माध्यमातून घेण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. तसेच संदर्भ क्र. ३ व ४ येथील अनु. दि.१७.११.२०२२ व १९.१२.२०२४ च्या अधिसूचनांद्वारे मा. उच्च न्यायालय तसेच राज्यातील इतर न्यायालयांचे कामकाजदेखील व्हिडीओ कॉन्फरसिंगमार्फत घेण्याच्या अनुषंगाने नियम करण्यात आले आहेत.

४. उक्त पार्श्वभूमी लक्षात घेता, विभागीय चौकशी प्रकरणाची सुनावणी विहीत कालावधीत पूर्ण करुन चौकशीची कार्यवाही विहीत वेळेत परिणामकारकरित्या पूर्ण करणे आवश्यक असल्याने, तसेच काही प्रकरणी सामायिक चौकशीत अपचारी अधिकारी व साक्षीदार यांची संख्या जास्त असल्याने प्रादेशिक विभागीय चौकशी अधिकारी यांच्याकडे सोपविण्यात आलेल्या विभागीय चौकशीच्या प्रकरणांतील सुनावणी व्हिडीओ कॉन्फरसिंगच्या माध्यमाद्वारे घेऊन **ई-साक्ष नोंदवण्याबाबत पुढीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत :-**

४.१) प्रादेशिक विभागीय चौकशी अधिकारी यांच्याकडे सोपविण्यात आलेल्या विभागीय चौकशी प्रकरणांतील सुनावणी आवश्यकतेनुसार व्हिडीओ कॉन्फरसिंगच्या माध्यमाद्वारे आयोजित करुन अपचारी अधिकारी/कर्मचारी व सरकारी साक्षीदार यांची सरतपासणी व उलटतपासणी ई-साक्षीमार्फत नोंदविण्यात येईल.

४.२) व्हिडीओ कॉन्फरसिंगकरीता लागणारी आवश्यक ती यंत्रणा प्रादेशिक विभागीय चौकशी अधिकारी यांच्या कार्यालयाने उभारावी. **व्हिडीओ कॉन्फरसिंग यंत्रणा कार्यान्वित झाल्यानंतर ई-साक्ष नोंदविण्याची कार्यवाही सुरु करावी.**

४.३) विभागीय चौकशी प्रकरणातील अपचारी अधिकारी/कर्मचारी व सरकारी साक्षीदार ज्या जिल्ह्यात कार्यरत किंवा वास्तव्य करीत असतील त्या जिल्ह्यात किंवा त्यालगतच्या जिल्ह्यात त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात किंवा संबंधित प्रशासकीय विभागाच्या अधिनस्त कार्यालयाच्या जिल्हा मुख्यालयात उपस्थित राहून व्हिडीओ कॉन्फरसिंगच्या माध्यमाद्वारे ई-साक्ष नोंदवावी.

४.४) उक्तप्रमाणे ई-साक्ष नोंदविण्यासाठी, संबंधित प्रशासकीय विभागांनी संबंधित प्रकरणात नियुक्त केलेल्या नोडल अधिकारी यांच्यामार्फत उपलब्धतेनुसार जिल्हाधिकारी कार्यालयात किवा संबंधित प्रशासकीय विभागाच्या अधिनस्त कार्यालयात आवश्यक ती व्यवस्था करावी. त्याप्रमाणे संबंधित कार्यालयाचा ई-मेल आयडी संबंधित प्रादेशिक विभागीय चौकशी अधिकारी यांच्या कार्यालयास कळवावा. यासाठी संबंधित शिस्तभंगविषयक प्राधिकाऱ्यांनी/प्रशासकीय विभागांनी, ई-साक्ष नोंदविण्यासाठी प्रादेशिक विभागीय चौकशी अधिकारी यांच्या कार्यालयासाठी व ई-साक्ष नोंदविण्याकरिता उपलब्ध करण्यात आलेल्या कार्यालयासाठी, अशा सर्व ठिकाणी संबंधित शिस्तभंगविषयक प्राधिकाऱ्यांचे/अधिनस्त कार्यालयातील, किमान गट-ब मधील अधिकाऱ्याची समन्वय अधिकारी म्हणून नियुक्ती करावी. सदर समन्वय अधिकारी ई-साक्ष नोंदविण्यासाठी संबंधित कार्यालयात आवश्यक ती तांत्रिक व्यवस्था करील. तसेच अपचारी अधिकारी/कर्मचारी व सरकारी साक्षीदार यांना आवश्यक असणारी कागदपत्रे उपलब्ध करुन देईल. यासाठी सुनावणीची तारीख अवगत झाल्यानंतर त्या त्या कार्यालयाच्या समन्वय अधिकारी यांनी संबंधितांच्या संपर्कात राहून उचित कार्यवाही करावी.

४.५) ई-साक्षीसाठी उपस्थित राहताना, संबंधित अपचारी अधिकारी/कर्मचारी व सरकारी साक्षीदार, नियमानुसार परवानगी देण्यात आलेला बचाव सहायक, बचाव साक्षीदार यांनी, त्यांचे ओळखपत्र (identification proof, Photo ID) आधारकार्ड/पॅनकार्ड/निवडणूक ओळखपत्र/ड्रायव्हींग लायन्सस इ.पैकी एक सोबत घेऊन येणे बंधनकारक राहील. सदर ओळखपत्र संबंधित कार्यालयातील समन्वय अधिकारी यांना दाखविल्यानंतर व त्यांनी ते मान्य केल्यानंतरच त्यांना ई-साक्षीसाठी उपस्थित राहण्याची परवानगी देण्यात येईल. यासंबंधात काहीही संशयास्पद आढळल्यास चौकशी अधिकारी यांच्याकडून संबंधित अपचारी अधिकारी/कर्मचारी व सरकारी साक्षीदार तसेच नियमानुसार परवानगी देण्यात आलेला बचाव सहायक, बचाव साक्षीदार यांना साक्षीसाठी प्रत्यक्ष उपस्थित राहण्याबाबत आदेश देण्यात येतील.

४. ६) संबंधित समन्वय अधिकारी, अपचारी अधिकारी/कर्मचारी व सरकारी साक्षीदार, बचाव सहायक, बचाव साक्षीदार यांनी ई-साक्ष सुरु होण्याच्या वेळेपूर्वी ३० मिनिटे आधी संबंधित कार्यालयात उपस्थित राहणे आवश्यक आहे. तसेच संबंधित कार्यालयाच्या ई-साक्षीच्या दालनात अन्य व्यक्ती यांना प्रवेश निषिध्द राहील याची दक्षता संबंधित समन्वय अधिकाऱ्याने घेणे आवश्यक आहे.

४.७) ई-साक्ष नोंदवताना, संबंधित कार्यालयातील समन्वय अधिकारी यांनी व्हिडीओ कॉन्फरन्सिंगसाठी पुढीलप्रमाणे आवश्यक बाबी तसेच सूचनांचे कटाक्षाने पालन होत आहे याची दक्षता घ्यावी:-

अ) किमान १० एमबीपीएस इंटरनेट कनेक्शन (ब्रॉडबँड/एफटीटीएच/५जी इ.)

ब) विंडोजमध्ये कॅमेरा चालणारा लॅपटॉप/डेस्कटॉप किंवा इतर कोणतीही ऑपरेटिंग सिस्टम. व्हिडीओ कॉन्फरसिंगसाठी मोबाइल फोनचा वापर कोणत्याही वापरकर्त्या अधिकारी/ कर्मचाऱ्यांसाठी अनुज्ञेय नाही.

क) ई-साक्षीसाठी वापरण्यात येणारा लॅपटॉप किंवा संगणक संबंधित कार्यालयाच्या नावे असावा.

ड) व्हिडिओ कॉन्फरन्समार्फत ई-साक्ष नोंदविण्यासाठी समन्वय अधिकाऱ्यांनी संगणक / लॅपटॉप वर आवश्यक व्हिडिओ कॉन्फरन्सिंग सॉफ्टवेअर स्थापित (Install) करावे.

फ) ई- साक्ष नोंदविताना कॅमेरा स्थिर स्थितीत आहे आणि अपचारी अधिकारी/कर्मचारी व सरकारी साक्षीदार, बचाव सहायक, बचाव साक्षीदार यांच्या डोळ्याच्या पातळीवर केंद्रित आहे आणि त्यांच्या चेहऱ्यावर पुरेसा प्रकाश आहे याची दक्षता घ्यावी. तसेच संबंधित अधिकारी कॅमेऱ्यापासून खूप दूर किंवा खूप जवळ बसणार नाहीत, तसेच स्क्रीनवर त्यांचा चेहरा अस्पष्ट किंवा गडद दिसू नये व तो स्पष्टपणे ओळखता येण्याजोगा असेल याची दक्षता घेण्यात यावी.

ग) बहु-पक्षीय सुनावणी दरम्यान साक्ष योग्यरित्या नोंदविण्यासाठी, एका वेळी एकानेच बोलून शिस्त राखावी. तसेच मायक्रोफोन म्यूट ठेवावा व सरतपासणी किंवा उलटतपासणी घेताना ज्यावेळी संबंधित अधिकारी प्रश्नोत्तरांसाठी साक्ष देईल त्यावेळीच तो अनम्यूट असेल याची काळजी घ्यावी.

४.८) अपचारी अधिकारी/कर्मचारी, सरकारी साक्षीदार, बचाव सहायक, बचाव साक्षीदार असे एकूण चार पेक्षा जास्त नाही इतकेच अधिकारी एकावेळी ई-साक्ष नोंदविण्यासाठी उपस्थित राहतील.

४.९) प्रत्येक अपचारी अधिकारी/कर्मचारी व सरकारी साक्षीदार यांचे ई-मेल आयडी संबंधित प्रकरणासोबत देणे बंधनकारक आहे. ज्या अपचारी अधिकारी/कर्मचारी व सरकारी साक्षीदार यांचे ई-मेल आयडी उपलब्ध नसतील अशा अधिकारी/कर्मचारी यांना ई-साक्ष नोंदविण्याची परवानगी देण्यात येणार नाही. प्रत्येक ई-साक्ष सुनावणीचे पत्र/समन्स अपचारी अधिकारी/कर्मचारी व सरकारी साक्षीदार यांना फक्त ई-मेलद्वारेच पाठविण्यात येईल. संबंधित शिस्तभंगविषयक प्राधिकाऱ्यांनी/प्रशासकीय विभागांनी विभागीय

चौकशी प्रकरणातील सर्व अपचारी अधिकारी यांच्याकडे शासकीय ई-मेल आयडी असल्याची खात्री करावी. नसल्यास, ई-मेल आयडी प्राप्त करुन घेण्याची कार्यवाही करावी.

४.१०) वरीलप्रमाणे ई-साक्षीमार्फत सुनावणी घेताना, रोजनाम्यात, सदर साक्ष ई-साक्षीमार्फत नोंदविण्यात येत आहे, अशी नोंद घ्यावी.

४.११) वरीलप्रमाणे ई-साक्षीमार्फत सुनावणी घेताना ज्या कार्यालयात ई-साक्ष नोंदविण्यात येणार आहे. त्या कार्यालयातील समन्वय अधिकारी यांनी जे अपचारी अधिकारी/कर्मचारी व सरकारी साक्षीदार सेवेत कार्यरत आहेत, असे अधिकारी/कर्मचारी यांनी शक्य असल्यास डिजीटल स्वाक्षरीद्वारे (e-sign) रोजनाम्यावर स्वाक्षरी नोंदवावी. अन्यथा सर्व अपचारी अधिकारी/कर्मचारी व सरकारी साक्षीदार यांच्याबाबतीत रोजनामा त्वरीत ई-मेलद्वारे संबंधित कार्यालयास पाठविण्यात येईल. ई-साक्ष पूर्ण झाल्यावर संबंधित समन्वय अधिकारी यांनी सदर रोजनाम्याची प्रिंट घेऊन त्यावर अपचारी अधिकारी/कर्मचारी व सरकारी साक्षीदार यांची स्वाक्षरी घेऊन, स्वाक्षरित रोजनामा त्याचवेळी प्रादेशिक विभागीय चौकशी अधिकारी यांच्या कार्यालयात त्वरीत ई-मेल करावा.

४.१२) ई-साक्षीचे चित्रीकरण केले जाणार नाही, याची दक्षता संबंधित समन्वय अधिकारी यांनी घ्यावी. वरीलप्रमाणे साक्ष नोंदविण्यासाठी प्रादेशिक विभागीय चौकशी अधिकाऱ्यांच्या कार्यालयाकडून ई-साक्षीसाठी "लिंक" उपलब्ध करुन देण्यात येईल व सदर ई-साक्ष रेकॉर्ड/चित्रमुद्रीत करण्यात येणार नसल्याने अपचारी/साक्षीदार इ. यांनी व्हिडिओ रेकॉर्डीगची मागणी करु नये.

४.१३) अपचारी अधिकारी/कर्मचारी किंवा सरकारी साक्षीदार हे गंभीर स्वरुपाच्या वैद्यकीय कारणास्तव, संबंधित प्रशासकीय विभागाकडे केलेल्या व्यवस्थेनुसार जिल्हाधिकारी कार्यालय/संबंधित प्रशासकीय विभागाचे अधिनस्त कार्यालय इ. ठिकाणी उपस्थित राहू न शकल्यास, त्यांना त्यांच्या निवासस्थानातून संगणकाद्वारे/भ्रमणध्वनीद्वारे व्हिडीओ कॉन्फरन्सच्या माध्यमातून ई-साक्ष नोंदविण्याची मुभा असेल.

तथापि, याबाबतची पूर्वपरवानगी घेण्यासाठी संबंधित अपचारी अधिकारी/कर्मचारी व सरकारी साक्षीदार यांनी प्रादेशिक विभागीय चौकशी अधिकारी यांच्याकडे निवेदन सादर करावे. तथापि, अशी परवानगी मिळाल्यानंतर ई-साक्ष नोंदविताना संबंधित अपचारी अधिकारी व सरकारी साक्षीदार यांनी त्यांच्यासोबत नियमानुसार परवानगी देण्यात आलेला बचाव सहायक वगळता अन्य व्यक्ती सोबत असणार नाही याची दक्षता घ्यावी. तसेच सर्व संबंधित अपचारी अधिकारी/कर्मचारी, सरकारी साक्षीदार, बचाव सहायक, बचाव साक्षीदार यांनी सदर साक्ष नोंदविताना ओळखपत्र (identification proof, Photo ID) दर्शविणे बंधनकारक असेल.

४.१४) उक्त सूचनेशिवाय ई-साक्ष नोंदविताना काही अडचणी उद्भवल्यास "High Court of Bombay Rules for Video Conferencing for Courts २०२२" चे अवलोकन करावे. सदर सूचना उच्च न्यायालयातील कामकाजासंदर्भात आहेत. प्रादेशिक विभागीय चौकशी अधिकारी यांच्या कार्यालयांकडील चौकशीचे कामकाज अर्धन्यायिक स्वरुपाचे आहे. उच्च न्यायालयाची कार्यपध्दती तसेच विभागीय चौकशी प्रकरणांतील सुनावण्यांची कार्यपध्दती यांमध्ये भिन्नता असल्याने, ज्याठिकाणी उच्च न्यायालयाने केलेले नियम हे प्रादेशिक विभागीय चौकशी अधिकारी यांच्याकडील चौकशीच्या अर्धन्यायिक प्रकरणांसाठी लागू होऊ शकतील, अशा प्रकरणांमध्ये उच्च न्यायालयाच्या नियमांचा संदर्भ लागू करण्याबाबतचे अंतिम निर्णय प्रादेशिक विभागीय चौकशी अधिकारी यांच्यामार्फत घेतले जातील.

४.१५) सदर परिपत्रकातील सूचना, राज्य शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या नियम/अधिनियम/शासन आदेश यांच्या अधीन राहतील.

५. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक संकेतांक क्र. २०२५०८२६११४९२८४९०७ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

SUCHITA MOHAN MAHADIK

Digitally signed by SUCHITA MOHAN MAHADIK
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT, 2.5.4.20=6578e224c4a0d2c9bfb7e7e33b474757c1425d0a03e653bc4f0a25b70698158e, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=E146A6DDC8FB6681D49A5099661D41639DA6C568419F071BB9CDFD8A2E08058C, cn=SUCHITA MOHAN MAHADIK
Date: 2025.08.26 11:50:21 +05'30'

**(सुचिता महाडिक)**
**सह सचिव, सामान्य प्रशासन विभाग**

**प्रति,**

१) मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव,
२) मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव,
३) मा.उपमुख्यमंत्री (नगरविकास) यांचे सचिव,
४) मा.उपमुख्यमंत्री (वित्त व नियोजन) यांचे सचिव,
५) मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव,
६) मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव,
७) मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव,
८) मा.उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे खाजगी सचिव,
९) मा.विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानसभा,
१०) मा.विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानपरिषद,
११) सर्व मा. विधीमंडळ सदस्य
१२) मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन
१३) शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव/ सचिव,
१४) सर्व मा.मंत्री व मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
१५) महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१६) प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ शाखा), मुंबई,
१७) प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा), मुंबई,
१८) प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई
१९) सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
२०) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
२१) आयुक्त, राज्य निवडणूक आयोग, मुंबई
२२) महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई
२३) सर्व विभागीय आयुक्त,
२४) सर्व जिल्हाधिकारी,
२५) प्रादेशिक विभागीय चौकशी अधिकारी, कोकण/पुणे/ नागपूर/ छ.संभाजीनगर / नाशिक/अमरावती/
२६) सर्व मंत्रालयीन विभाग मंत्रालयीन विभागांच्या नियंत्रणाखालील सर्व विभागप्रमुख तसेच प्रादेशिक विभागप्रमुख/ कार्यालय प्रमुख
२७) निवडनस्ती (विचौ-२)